नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०१/२०२५ (रविवार) दुपार

---

## अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे भिवापूरः— दिनांक २५/०१/२०२५ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करत असता एका गुप्त बातमिदाराकडुन माहिती मिळाली की मौजा नांद शिवार भिवापुर येथे वाळु अवैधपणे ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये लोड केली जात आहे. अशा माहितीवरुन पोलीस स्टाफ घटनास्थळी गेले असता आयसर ट्रॅक्टर क्र. एम एच —४०—सी क्यु— २४५४ चालक/मालक सुरज नथ्थुजी हिवरे वय ३२ वर्ष, रा. नांद ता. भिवापुर जि नागपुर हा अवैध रेतीची वाहतुक करताना मिळुन आल्याने सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता ट्रॅक्टर मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने वाहन आरोपीच्या ताब्यातून ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी क्यु — २४५४ किंमती ५०००००/—रूपये त्यामध्ये ०१ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/— रू व त्यास लागुन असलेली अस्पष्ट क्रमांक असलेली गडद लालसर रंगाची ट्रॉली किंमत ५००००/— रू असा एकुण ५५५०००/— रू चा माल घटणास्थळावर जप्त करण्यात आला. आरोपी सुरज नथ्थुजी हिवरे, वय ३२ वर्ष, रा. नांद ता. भिवापुर जि. नागपुर यांचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५), भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खान आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे केळवदः— दि. २५/०१/२०२५ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा केळवद शिवार येथे बोलेरो पिकअप वाहनामध्ये अवैध जनावरांची वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून मौजा केळवद शिवार येथे नाकाबंदी केली असता यातील पांढ—या रंगाची बोलेरो पिकअप गाडी क्र एम पी १३ झेड ०९५७ अंदाजे किंमत ५,००,०००/— रू चे चालकाने महाराष्ट्रात गौवंश हत्याबंदी कायदा असल्याचे माहीत असतांना सुध्दा गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चा—या पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपु—या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैध्यरित्या वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन १) ०६ नग लाल रंगाचे गौवंश गोरे वय अंदाजे ०८ ते १२ महीने प्रत्येकी किंमत १०,०००/—रू प्रमाणे किंमत ६०,०००/—रू २) ०४ नग काळया रंगाचे गौवंश गोरे वय अंदाजे ०८ ते १२ महीने प्रत्येकी किंमत १०,०००/—रू प्रमाणे किंमती ४०,०००/—रू ३) ०१ नग पांढ—या भुरकट रंगाचा गौवंश गोरा अंदाजे ०८ ते १२ महीने किंमती १०,०००/—रू तसेच सदर पांढ—या रंगाची बोलेरो पिकअप गाडी क्र एम पी १३ झेड ०९५७ किमती ५,००,०००/—रू असा एकुन ६,१०,०००/— रू चा माल जप्त करण्यात आला. आरोपी बोलेरो पिकअप गाडी क्र एम पी १३ झेड ०९५७ चा चालक याचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम २८१ बी एन एस सह कलम ११(१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति. अधिनियम १९६० सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षन अधि. १९९५ सहकलम ११९ म.पो.का सहकलम १८४,२३९/१७७ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**